International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 7 No. 2 January – February - 2026

# मध्ययुगीन ज्ञान परंपरेतील बसवेश्वरांचे वैश्विक विचार

**प्रा. सुमन लक्ष्मणराव केंद्रे**

*इतिहास विभाग, कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालय, पंढरपूर.*

*Corresponding Author - प्रा. सुमन लक्ष्मणराव केंद्रे*

**DOI - 10.5281/zenodo.18709882**

**प्रस्तावना:**

मध्ययुगीन भारताच्या इतिहासात ज्यांनी परकीय धर्माचे भारतीय धर्म व संस्कृतीवर आलेले आक्रमण थोपवून धरण्याचे कार्य केले, ज्यांना मध्ययुगीन भारताच्या इतिहासात एक क्रांतिकारक व्यक्तिमत्व म्हणून ओळखले जाते, ज्यांनी शिवभक्तीचा प्रचार आणि प्रसार केला आणि त्या माध्यमातून समाज सुधारणा हे आपल्या कार्याचे सूत्र ठेवले, जातीभेद विरहित समाज, शिवभक्ति, अस्पृश्याचे उच्चाटन ही ज्यांच्या सामाजिक कार्याची दिशा बनली, अस्पृश्य आणि ब्राह्मण यांचा ज्यांनी विवाह घडवून एक क्रांतिकारी पाऊल रचले आशा महात्मा बसवेश्वर यांनी वीरशैव या पंथाची स्थापना केली. इ.स.वी सनाच्या बाराव्या शतकात कर्नाटकात सांस्कृतिक व धार्मिक इतिहासामध्ये वीरशैव पंथाने चार दशके महत्त्वपूर्ण भूमिका बजावली त्या पंथाच्या विचाराचा, आदर्शाचा व शिकवणुकीचा सध्याच्या सामाजिक जीवनावर परिणाम झालेला दिसून येतो. मध्ययुगीन भारताच्या इतिहासात वीरशैव हा भक्ती संप्रदाय ज्ञानदेव पूर्वकाळात उदयाला आला. शिव हे या संप्रदायाचे आराध्यदैवत,त्यांची अनन्यभक्ती हे या संप्रदायाचे प्रमुख साध्य होते. प्रस्तुत शोध प्रबंधाचा हेतू वीरशैव लिंगायत ज्ञान परंपरेतील महात्मा बसवेश्वराच्या कार्याचा आढावा घेणे हा आहे.

**बसवेश्वरांचे जीवन चरित्र:**

बागेवाडी येथे बसवेश्वराचा जन्म 1105 मध्ये एका ब्राह्मण कुटुंबात झाला. त्यांच्या वडीलाचे नाव मादीराज आणि आईचे नाव मादलाबिक होते. मादिरा कामेकुला येथील होते . बागेवाडी वर शैववावादाचा प्रभाव होता. बसवेश्वरांच्या वडिलांनी उपनयन संस्कार करून घेतला. बसव ज्यावेळेस आठ वर्षाचे होते त्यावेळेस त्यांच्या जीवनाला एक वेगळेच वळण मिळाले. ब्राह्मण धर्माच्या शिकवणुकीचा तरुण बसवेश्वर यांच्यावरती परिणाम झाला नव्हता. ते ब्राह्मण संस्कृतीच्या विरोधात होते. तेथे त्यांनी काही दिवस घालविले व बागेवाडीतून निघून संगमला आले. त्यांचे आराध्य दैवत म्हणजे संगमचे संगमेश्वर होय. तेथे राहून त्यांनी वैदिक, संस्कृत, पुराण, विविध धार्मिक तत्वज्ञानाचे शिक्षण घेतले. कुडळसंगम मध्ये त्यांनी जवळजवळ वीस वर्ष घालवली. येथे त्या काळातील त्यांच्या आदर्शाचे व कार्याचे फुलद्रूप परिणाम दिसून येतात. त्यानंतर त्यांनी ब्रिझेलच्या दरबारात 101 होनवरती प्रत्येक सालासाठी सहाय्यक लेखापाल म्हणून काम केले. काही कालावधीतच बसवेश्वर यांना दरबारात सर्वात जास्त महत्वाचे स्थान प्राप्त झाले. ११६२ मध्ये ते ब्रिजलचे महामंत्री झाले. परंतु काहीच काळात ते एकमेकाचे शत्रू झाले. कारण ब्रिझेल हा जैन धर्माचा समर्थक तर बसवेश्वर वीरशैव संप्रदायाचे समर्थक होते यातून दोघांमध्ये वाद

निर्माण झाला. तरीसुद्धा बसवेश्वर यांनी आपल्या कार्याला अडथळा न येऊ देता ते कार्य ते पूर्ण करत राहिले.

बसवेश्वर हे शिवभक्त होते त्यांच्या मते आपण सर्वजण एकच आहोत. जन्म, लिंग, जात, धर्म, गरीब-श्रीमंत, उच्च-नीच असा कोणताही भेदभाव त्यांनी केला नाही. ते खालच्या लोकांसोबत बसून जेवण करीत. त्यांच्यात मिळून मिसळून राहत असत आणि हे ब्रीझेलला आवडत नसे. म्हणून त्यांनी बसवेश्वराचा अनेक वेळा अपमान केला परंतु बसवेश्वर यांनी सामाजिक व धार्मिक चळवळ जोमाने सुरू ठेवली होती. यासाठी त्यांच्या अनुयायांनी संपत्ती व जंगम मालमत्ता बस्वेश्वराकडे दिली. तसेच ब्रिझेल आणि बसवेश्वर यांच्यात जैन धर्माचा- की वीरशैव पंथाचा जास्त प्रचार झाला पाहिजे यासाठी वाद निर्माण झाला. शेवटी यात वीरशैव पंथाचे दोन अनुयायी ठार झाले. याचे रुपांतर धर्म संघर्षात झाले. पण बसवेश्वरांनी आपले कार्य शेवट पर्यंत चालू ठेवले.

**अनुभव मंडप:**

बसवेश्वराच्या भक्तीचा आणि कर्तुत्वाचा जनमानसावर विलक्षण प्रभाव पडला. त्यांनी धार्मिक , पारमार्थिक जीवनात क्रांतिकारक असे बदल घडवून आणले. महामने येथील अनुभव मंडपात या भक्ती आंदोलनाला सांप्रदायिक स्वरूप प्राप्त झाले. त्यांच्या प्रवचनातून वचनसाहित्य जन्माला आले. ते गद्यस्वरूप वाटर असले तरी त्यातील काव्यात्मकता, अलौकिक गुढ, ती रूपकात्मकता आणि प्रतिमा सृष्टीतून दिव्य अनुभव व्यक्त करणारी आहे. उदाहरणार्थ शिवस्वरूप विश्वरूप होऊन त्यांच्या भावसृष्टीत नटते तेव्हा ते म्हणतात ,

मी जिथे जातो तिथे तू मला भेटतोस
या विशाल विश्वरूपात तूच मला दिसतोस
आणि तूच या विश्वाचा डोळा बनतोस
तू आपल्या बलदंड बाहुत विश्वरूप कवटाळतोस
हे कुडलसंगमा
मला सर्वत्र तुझ्याच पाऊल खुणा दिसत आहेत.

अशा रीतीने बसवेश्वराने शिवाला विश्वरूपात अनुभवलं होतं.

बसवेश्वराने चातुर्यवरणाला आव्हान देऊन सर्व मानवाला समान मानले. त्यामुळेच बसवेश्वरांच्या भोवती सर्व जाती धर्मातील लोक जमा होत असत. शिवाय त्यांनी आंतरजातीय रोटी व्यवहार व बेटी व्यवहाराला प्रोत्साहन दिले, शिवाय विधवा पुनर्विवाहाला मान्यता व बालविवाहाला विरोध केला. बुरसट जुन्या प्रथा परंपराला, कल्पनांना त्यांनी विरोध केला. शारीरिक श्रम किंवा व्यवसाय हा स्वर्ग आहे अशी घोषणा करणारे आणि कैलासगड हा सिद्धांत मांडणारे बसवेश्वर होते. वीरशैव समाजाचा प्रचार आणि प्रसार करण्यासाठी त्यांनी मठ स्थापन केले. त्यांना अनुभव मंडप असे म्हणतात. या पंथाचे अनुयायी तयार करण्यासाठी त्यांनी अनेक वेळा या अनुभव मंडपातून बैठका, मिळावे घेतले. यामध्ये स्त्रियांचाही सहभाग होता, हीच संघटना पुढे अनुभव मंडप किंवा साक्षात्कारवादी संस्था म्हणून नावारूपाला आली. हे सर्व भक्त वेगवेगळ्या धर्मातून जातीतून पुढे आलेले होते. उदा. ब्राह्मण, कुंभार, धोबी, सोनार,चांभार, न्हावी इत्यादी.

**वीरशैव पंथाचे आचारधर्म:**

महात्मा बसवेश्वराच्या प्रयत्नाने प्रसारित झालेला वीरशैव या पंथाचे काही मौलिक आचारधर्म होते ते आष्टावर्णनम व षटस्थल या दोन पारिभाषिक शब्दात सांगण्यात येतात. वीरशैव पंथ ज्यांना स्वीकारायचा असेल त्यांनी काही गोष्टीचे पालन केले पाहिजे होते. जसे:- गुरुची आज्ञा पाळणे, शिवाची पूजा लिंग स्वरूपात करणे, जंगमा विषयी श्रद्धा बाळगणे, अंगावर विभूती लावणे, रुद्राक्ष माळा

धारण करणे तीर्थ घेणे, नैवेद्य दाखवून प्रसाद घेणे, नमः शिवाय या पंचाक्षरी किंवा ओम नमः शिवाय या मंत्राचा जप करणे या अष्टवर्णाच्या पालनाने व्यक्तीच्या धर्मश्रद्धेचा विकास होतो, धर्मश्रद्धा बळावते म्हणजे षटस्थळाचा किंवा मोक्षमार्गाच्या सहा पायऱ्यांचा मार्ग आक्रमण करून शिवस्वरूपाशी ऐक्य संपादन करता येते हाच जीवनातील परमोक्षक क्षण असतो असे वीरशैव पंथाचे मत होते.

**लिंगधारणा:**

लिंगधारणा ही वीरशैवाचे मुख्य आचार्य लक्षण होय. पुराणामध्ये देवाधिकानी लिंगधारणा केल्याची उदाहरणे असल्यामुळे व पंढरपूरच्या विठोबाच्या मस्तकावर तर बार्शी येथील भगवानाच्या मस्तकावर, कोल्हापूरच्या महालक्ष्मीच्या वक्षस्थळावर, तुळजापूरच्या भवानीच्या मस्तकावर, वळवणीच्या वीरभद्राच्या मस्तकावर, शिवलिंग असल्याने अनुयायानी सुद्धा लिंगधारणा केली पाहिजे असे या पंथाचे मत होते. सद्गुरुनी दीक्षापूर्वक दिलेले ईस्टलिंग सोने,चांदी, लाकूड इत्यादीपासून बनविलेल्या लहान पेटीत घालून ते जाणव्यासारखे गळयात धारण केले जाते. कपाळावर व सर्वांगावर भस्म लेखन करणे, ओम नमः शिवाय हा गुरुमंत्र मुखाने म्हणणे हे महत्त्वाचे आचार मानले जातात. लिंग, जंगम, विभूती, रुद्राक्ष, मंत्र, प्रादुदक, आणि प्रसाद हे आष्टावर्णनम होत. या आष्टावर्णननामुळे साधक सूचीभूत होतो. संप्रदायिक, सामाजिक दृष्ट्या महत्त्वाचे नियम म्हणजे पंचाचार, शिवाचार, लिंगाचार, सदाचार, भृत्याचार आणि गणाचार हे पंचाचार होते. प्रत्येक वीरशैव अनुयायाने रोज पंचयज्ञ करणे आवश्यक मानले होते. ते पुढील प्रमाणे कर्मयज्ञ, जपयज्ञ, ध्यानयज्ञ, ज्ञानयज्ञ, तपयज्ञ होय.

**वीरशैव संप्रदायाची तत्त्वज्ञान व शिकवण:**

वीरशैव संप्रदायाचे तत्त्वज्ञान एकेश्वरवादी आहे. ब्रह्म विष्णू आणि महेश यापेक्षा शंकर श्रेष्ठ आहे म्हणूनच शिवाची भक्ती केली पाहिजे असे या पंथाचे मत होते. शिवाची सेवा, उपासना केल्याने जीवाची संसार दु:खातून मुक्तता होते. जीव शिवस्वरूप होतो एखाद्या साधकाला जर वीरशैव संप्रदायाची दीक्षा घ्यायची असेल तर दीक्षा घेण्याचा अधिकार गुरुला असून 21 प्रकारच्या दीक्षा सांगितले आहेत त्यापैकी विधीदीक्षा, मंत्रदीक्षा, क्रियादिक्षा या तीन दीक्षा प्रमुख मानतात.

बसवेश्वर व त्यानंतरच्या आचार्यानी केलेल्या कामामुळेच वीरशैव या संप्रदायाला कर्नाटक, महाराष्ट्र इत्यादी प्रदेशात मोठ्या प्रमाणात लोकप्रियता मिळाली. बश्वेश्वर यांनी भक्ती परंपरेला तत्त्वज्ञान व आचारधर्म याची चौकट प्राप्त करून दिली. त्यांनी हे काम कल्याणी येथील अनुभवमंडपातून केले ज्यामध्ये पुरुषाबरोबर स्त्रियांचाही समावेश होता. जेंव्हा मध्ययुगीन भारतात स्त्री गुलामगिरीच्या बंधनांनी दबली गेली होती तिला वीरशैव संप्रदायात समानता होती.

**वीरशैव पंथाचे योगदान:**

मध्ययुगीन भारताच्या इतिहासात शैवपंथाचे योगदान महत्वपूर्ण मानले जाते. ऋग्वेद काळापासून शिव व रुद्र या देवतांचे अस्तित्व होतेच. ब्राह्मण काळात शिवाच्या पूजनाला विशेष महत्त्व मिळाले. भक्ती योगाला प्राधान्य मिळवून शिवाची भक्ती करणारे शैव म्हणून ओळखले जाण्यास सुरुवात झाली. परकीय धर्माचे भारतीय धर्म व संस्कृतीवर झालेली आक्रमक रोखण्याचे कार्य हिंदू धर्मातील बसवेश्वराच्या वीरशैव पंथाने केले असे दिसते. हिंदू धर्माच्या प्रसाराबरोबर हिंदू वास्तू कला, मूर्ती कला, शिल्पकला आवश्यक क्षेत्रात मोठ्या प्रमाणात प्रगती घडवून

आणण्याचे कार्य या पंथांनी केले. हिंदू समाजात समन्वयाची, समानतेची, सामाजिक एकतेचे वातावरण काही प्रमाणात निर्माण करण्याचे श्रेय बसवेश्वरांच्या विचारसरणीला द्यावे लागते. यावेळी लोकभाषेला प्राधान्य दिल्यामुळे लोकभाषेतील साहित्य समरूप झाले.

**सारांश:**

मध्ययुगीन भारताच्या द्यानपरंपरेत बसवेश्वरांच्या वीरशैव पंथाचे विचार, अध्यात्म, सामाजिक न्याय, आणि वैचारिक प्रबोधन घडवून आणणारे ठरतात. महात्मा बसवेश्वरांनी आपल्या विचाराच्या माध्यमातून भक्तीचा सहज सुलभ मार्ग जनसामान्यांना उपलब्ध करून दिला. चातुर्यवर्ण व जातीभेदाच्या आधारित श्रेष्ठ कनिष्ठत्वाच्या विचार व अचाराने विघटित झालेल्या समाजाला सामाजिक समानता व एकतेचा संदेश या वीरशैव पंथांणे दिला. स्त्री – शुद्रादी, संत व महंतांना समाजात उच्च जातीच्या संत महंता इतकेच मानाचे व आदराचे स्थान या पंथाने दिले. जातीभेद विरहित ईश्वरी कृपा संपादन करण्याचा किंवा मोक्ष प्राप्तीचा मार्ग समाजातील सर्वांना मिळवून देण्याचे काम बसवेश्वर आणि या पंथांच्या माध्यमातून केले गेले. सर्वसामान्य समाजाला त्यांच्या भाषेतून हे ईश्वर भक्तीचे ज्ञान, तत्त्वज्ञान व विचार उपलब्ध झाले. त्यामुळे समाजाला समानतेची व एकजिनसीपणाची नवी दिशा मिळाली हे बसवेश्वरांच्या कार्याचे द्यौतक आहे असे म्हणता येईल

**संदर्भ ग्रंथ:**

१) भिडे गजानन, मध्ययुगीन भारत, फडके प्रकाशन, कोल्हापूर, सप्टेंबर २००२.
२) भिडे जी.एल., प्राचीन भारताचा सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक इतिहास, फडके प्रकाशन, कोल्हापूर, जानेवारी २०००.
३) देसाई पी.व्ही. बसवेश्वर आणि त्यांचा कालखंड, संपादन, 1968.
४) डी. व्ही. काळे, महाराष्ट्राच्या प्राचीन राजधान्या,
५) महाराष्ट्र राज्य सरकारचा भौगोलिक कोश, जिल्हा सोलापूर, संपादन, १९७७.
६) गोसावी रा. रा., पाच भक्ती संप्रदाय, अक्षरजुळणी प्रकाशन, पुणे, २००८.